PAGE NO
DATE / /

# शब्दकोडं मंडळ

२६ फेब्रुवारी २००६ रोजी फिनिक्स मेट्रो महाराष्ट्र मंडळातर्फे एक थोडासा वेगळा आणि तितकाच बुद्धिला चालना देणारा असा उपक्रम राबवला गेला. हा उपक्रम म्हणजे सामुहिकरित्या शब्दकोडे सोडवण्याचा कार्यक्रम. हा कार्यक्रम तसा छोट्या प्रमाणात असल्यामुळे एका अपार्टमेंट कॉम्प्लेक्सचं क्लबहाऊस भाड्याने घेतलं होतं. दुपारी तीनची वेळ असुनही आणि फिनिक्सच्या उन्हाळ्याने आपल्या आगमनाची वर्दी द्यायला सुरुवात केली असुनसुद्धा क्लबहाऊसमध्ये कुतुहलयुक्त उत्साहाचं वातावरण होतं. एकीकडे गप्पा चालु होत्या तर एकीकडे महिला कार्यकर्त्यांची चहा-कॉफीची तयारी चालु होती. हळुहळु सगळे जमु लागले.

याच कार्यक्रमाचा एक छोटासा भाग किंवा छोटेसं अंग म्हणून पुस्तक आणि सीडीज्च्या देवाणघेवाणीला आम्ही वाव दिला होता त्यामुळे काही मंडळी त्यात दंग होती. चहा-कॉफीचा आस्वाद घेऊन झाल्यानंतर प्रत्येकाला शब्दकोड्याची एक एक कॉपी देण्यात आली. सोबत एक एक खोडरबर असलेली पेन्सिलही होती म्हणजे एखादा शब्द चुकलाच तर काळजी नको.

शब्दकोडं हाती आल्याबरोबर जवळजवळ प्रत्येकाने त्यातल्या शब्दांशी खेळायला सुरुवात केली. एकमेकांत कुजबुज सुरु झाली. ग्रुप्स तयार झाले. विविध वयोगटाची मंडळी १६ उभा शब्द,

२० आठवा शब्द असा विचार करण्यात गुंग झाली. मग मंडळाचा एक ~~कार्यक्रर्ता~~ कार्यकर्ता पुष्पक कर्णिक याने कार्यक्रमाची सूत्र आपल्या हातात घेतली. अडलेल्या सगळ्या प्रश्नांची सामुहिकपणे कोडे सोडवताना पटापट उत्तरे मिळाली. कोडं कधी उलगडलं ते कळलंपण नाही.

सगळं कोडं सोडवून झाल्यावर हे कोडं तयार करणाऱ्या सुषमा येरवडेकर यांचे आभार मानण्यात आले. मंडळींनी पुन्हा पुस्तक-सीडीजकडे आपला मोर्चा वळवला. एकमेकांमध्ये पुस्तकांची देवाणघेवाण करून, आपल्याला सापडलेल्या कोड्यामधल्या नव्याजुन्या शब्दांना बरोबर घेऊन सर्वजण पुन्हा भेटण्याच्या आश्वासनासह एकमेकांचा निरोप घेऊ लागले.